मराठवाडा

पोलीस टाइम्स

दिवाळी विशेषांक-2010

स्वागत मूल्य-51



श्री. भंवरलाल जैन "एक अखंड व्यक्तीमत्व"

लेखक : सुंदरलाल मल्हार

रजनीशांनी पुष्कळ वर्षांपूर्वी एक अद्‌भूत व्यक्तीची कल्पना केली होती. ती व्यक्ती म्हणजे 'झोरबा दी बुद्धा' आणि या कल्पनेला साकार करण्यासाठी सुद्धा त्यांनी पुर्ण शक्ती पणाला लावली होती. या कार्यात ते मोठ्या प्रमाणात यशस्वी सुद्धा होऊ शकले. त्यांच्या नंतर त्यांचे सन्याशी जगभर हिंडून हे काम पुढे नेत आहे. झोरबा एका इंग्रजी कादंबरीचा नायक आहे. तो अगदी भौतिकवादी आहे. ती जीवनात मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा फायदा घेत आहे. लहान सहान गोष्टीत अगदी रंगून जात आहे. संगीत असो की नृत्य, काव्य असो की, मेहफील, यात्रा असो की पिकनिक तो सर्वांमध्ये मनसोक्त आनंद लुटत आहे. अशी व्यक्ती म्हणजे झोरबा. झोरबा दी बुद्धा व्यक्तीची एक आणखी बाजू आहे ती म्हणजे 'बुद्धा' बुद्धा म्हणजे ज्ञानी व्यक्ती, ध्यानी व्यक्ती, आध्यात्मिमध्ये रस घेणारी व्यक्ती बुद्धत्वांकडे सतत यात्रा करणारी व्यक्ती रजनीश म्हणतात व्यक्तीमध्ये झोरबा आणि बुद्धा या दोघांचा समन्वय हवा आहे आणि अशी व्यक्तीच सर्वार्थाने संपूर्ण व्यक्ती किंवा समग्र व्यक्ती असते, असे समग्र व्यक्तीमत्व असलेले व्यक्ती आपल्याला कवचितच सापडतात.

जळगाव शहरात श्री. भंवरलाल जैन एक अशीच व्यक्ती आहे. ते स्वत:च्या जिवनात या दोघीही भूमिका समर्थपणे बजावत आहे. ते भौतिकदृष्ट्या जीतके समृद्ध आहे. तितकेच आत्मीकदृष्ट्या सुद्धा समृद्ध आहेत. त्यांनी एका लहानशा खेड्यात वाकोद येथे एका गरीब कुटुंबात जन्म घेतला आणि भौतिकदृष्ट्या समृद्ध होण्याचे स्वप्न पाहिले आणि या स्वप्नाला साकार करण्यासाठी त्यांनी सुरुवातीला रॉकेलचा व्यापार सुरु केला. नंतर पेट्रोल, डिझेल विकू लागले. हळूहळू त्यांची गरिबी नाहीशी होत गेली. नंतर त्यांनी कृषी संबंधी अनेक एजन्सी घेतल्या. राज्य भरात त्यांची प्रसिद्धी झाली ते आणखी समृद्ध झाले. नंतर त्यांनी उद्योग क्षेत्रात प्रवेश केला. पपेन बनविला, पाईप बनविले, ड्रीप इरिगेशनची सर्व साधने आपल्या कारखान्यात बनविली आणि यामुळे सर्व जगामध्ये त्यांचे नाव पोहोचले असे करत करत ते भौतिकदृष्ट्या फार समृद्ध झाले.

फक्त पैसे कमवून कोणी 'झोरबा' होतो असा नाही यासाठी आणखी कितीतरी गोष्टी मिळवायला हव्यात या साम्पतीक समृद्धी बरोबरच त्यांनी आपला मित्र परिवार सुद्धा वाढविला. वेळोवेळी ते आनंदासाठी, मौजेसाठी, लहान मोठ्या पार्ट्या आयोजित करू लागले. अनेक मित्रांना आमंत्रित करायचे त्यांच्या बरोबर गप्पा गोष्टी करायच्या, मनसोक्त हसायचे, मित्रांना प्रेमाने बोलाविणे, त्या-त्या बरोबर जेवण करणे, थट्टा मस्करी करणे हे त्यांचे स्वभावच बनले. यामुळे आज त्यांचे असंख्य मित्र आहेत. कादंबरीतला झोरबा ज्या प्रमाणे संपत्तीचा गुलाम नाही त्याच प्रकारे भवरलालला सुद्धा मी केव्हाही पैशाच्या आहारी गेलेला पाहिलेले नाही. विद्यार्थ्यांना मदत करणे, दिन दुखींना मुक्त हस्त देणे, वेगवेगळ्या संस्थांना स्वत:हून भरपूर अर्थ सहाय्य करणे आदि त्यांच्यासाठी आनंदाचे विषय आहेत. केव्हा केव्हा तर पैसे नसताना सुद्धा उसनवार पैसे घेऊन इतरांना मदत करायचे.

झोबरच्या जिवनात नृत्य आणि संगिताला फार मोठे स्थान आहे. भंवरलालजींना स्वत: व्यवस्थित गाता येत नाही की नृत्य करता येत नाही. परंतु त्यांना या कलेमध्ये फारच खच्ची आहे आणि यासाठी ते भरमसाठ खर्च सुद्धा करतात. संगित मेहफीलसाठी नृत्याच्या कार्यक्रमासाठी त्यांनी एक सुरेख साऊंड प्रुफ ऑडीटोरीयम सुद्धा बांधला आहे. येथे वर्षभर अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात आणि त्यावेळी भंवरलालजी आपले नातलग आणि मोठ्या मित्र परिवारासह मनसोक्त आनंद घेत असतात आणि कार्यक्रमानंतर सुंदर मेजवानी सुद्धा असतेच. कितीही व्यस्त त्यांचा कार्यक्रम असला तरीही ते अशा कार्यक्रमामध्ये हमखास उपस्थित राहतातच मध्ये मध्ये कवि संमेलन, मुशायरा सुद्धा या ऑडीटोरियम मध्ये आयोजित केले जातात.

झोरबा जिवनाच्या लहान लहान गोष्टीत ज्या प्रमाणे मजा घेत असतो त्याच प्रमाणे श्री. भंवरलालजी सुद्धा लहान लहान मुलांबरोबर खेळणे, पळणे, लहान लहान पादपाना मायाचा हात देणे, सकाळी फ़िरत असताना निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटणे, मानव निर्मित झरे तयार करून त्याची खळ खळ ऐकत बसणे लहान लहान पक्षांची गाण ऐकणे, त्यांच्या करिता विहाराची आणि अन्नाची व्यवस्था करणे, चित्रपटातील प्रेमाची आनंदाची गाणी ऐकणे, अचानकपणे आलेल्या विद्यार्थ्यांशी गप्पा गोष्टी करणे. त्यासाठी सहज काही योजना आखून त्यांना मदत करणे, आपल्यासाठी अगदी मस्त अत्याधुनिक सुरेख कार्यालयाची रचन करणे, तेथे बसून कार्यालयीन कामे करीत असताना मित्रांशी गप्पा गोष्टी करणे, लहान लहान विचारातून मोठ मोठे अर्थ शोधून काढणे. झोरबा प्रमाणे केव्हा केव्हा विचित्र योजना तयार करणे आणि त्या योजनेत मोठे नुकसान सहन करण्याचा सुद्धा मजा घेणे म्हणून असे वाटते की,

झोरबांनी भंवरलाल जैनच्या रूपात परत जन्म तर घेतला नाही ना?

आता आपण झोरबाची दुसरी बाजू 'बुद्धा' बद्दल विचार करु. बुद्धा ज्ञानी, ध्यानी व्यक्ती की जी आपल्या आत्म्याच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील आहे की, ज्याची जिवन यात्रा सतत सत्याकडे किंवा बुद्धत्वाकडे चालुच आहे.

श्री. भंवरलाल गाढे अभ्यासु आहे. त्यांचे अध्यायन नेहमी चालूच असते. आणि जर त्यांचे खाजगी ग्रंथालय पाहिले तर आपल्याला आश्चर्य झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या सहस्त्रावादी ग्रंथांच्या भांडारात तुम्हाला व्यवसाय आणि व्यवस्थापना व्यतिरिक्त तत्वज्ञान, मानसशास्त्र, काव्य, कला, विज्ञान, इतिहास, भूगोल वेगवेगळ्या क्षेत्रात नामांकित पुरुषांचे जीवन चरित्र आदि किती तरी विषयांचे ग्रंथ दिसतील. खरोखरच त्यांना वाचनाचे वेडच लागले आहे. सकाळी आणि रात्री त्यांनी वाचनासाठी ३ तास राखूनच ठेवलेले आहे. नवनवीनच ग्रंथाचा शोध चालूच असतो. फक्त ते वाचन करतात असे नाही महत्त्वाचे टिपण सुद्धा काढत असतात आणि आपल्या काही निवडक मित्रांबरोबर त्यावर चर्चा. सुद्धा करतात.

वाचना व्यतिरिक्त त्यांनी सकाळचे २ तास भ्रमण, योग, आणि ध्यानासाठी राखून ठेवले आहेत. चिन्मय मिशनचा भावतीत (टी.एम.) त्यांचा विशेष आवडता ध्यान आहे. केव्हा केव्हा ते या ध्यानाचे मार्गदर्शकांना सुद्धा आमंत्रीत करुन आपल्या मित्रांसाठी शिबिर आयोजित करतात. ध्यान असो की, योग असो की, आसने असो की, प्राणायाम असो अगदी काटेकोरपणाने आणि विज्ञानाची कास धरूनच या क्रियांचा अभ्याग करायला हवा. असा त्यांचा आग्रह असतो. सत्संगाची त्यांना फार आवड आहे. कोणीही बुद्ध पुरुष किंवा मानी पुरुष मिळाला की, त्यांच्याशी चर्चा करण्याची, त्यांच्या पासून काहीतरी शिकून घेण्याची त्यांची जबरदस्त उत्कठा असते आणि त्या प्रमाणे जीवन जगण्याचे प्रयत्न करतात. त्यांचा स्वाध्याय सतत चालूच असतो केव्हाही न संपणारी जिज्ञासा त्यांच्या अंगी आहे.

श्री. भंवरलाल तसे समृद्ध आहे परंतु त्याचे राहणीमान सुरेख पण सादगी आहे त्यांचे जेवण साधे आहे कोणत्याही प्रकारचे त्यांना व्यसन नाही इतकेच नाही तर चहा, कॉफी किंवा आधुनिक थंड पेय सुद्धा ते घेत नाही त्यांचा जन्म जैन परिवारामध्ये झालेला असून त्यांना जैन धर्माबद्दल सार्थ अभिमान आहे. मात्र इतर धर्माबद्दल त्यांच्या मनात अजीबात द्वेष नाही. जैन धर्मांनी त्यांना शिकविलेल्या सत्य, अहिंसा, अचौर्य, अपरिग्रह, मैत्री, क्षमा, करुणा आदि तत्वांवर श्रद्धा आहे. त्यांच्या मनात सर्वांबद्दल प्रेम आहे. मैत्री भावना आहे यामुळेच त्यांना मोठा मित्र परिवार लाभला आहे.

झोरबाचा या धरतीवर अपार प्रेम आहे, तसेच त्याचा स्वत:वर सुद्धा फार प्रेम आहे. त्याच प्रमाणे श्री. भंवरलाल यांनी तर आपले सर्व आयुष्यच या प्रेमळ, धरतीसाठी वाहून घेतले आहे. म्हणूनच ते 'भूमिपूत्र' म्हणून ओळखले जातात. तसेच त्यांचे आपल्या स्वत:चे शरीरावर सुद्धा फार प्रेम आहे ते आपल्या शरीराची भरपूर काळजी घेतात. खाण्या-पिण्यात सदैव संयम राखतात. शरीराबद्दल त्यांच्या मनात अनुग्रहाची भावना आहे. खरोखरच श्री. भंवरलाल जितके बाह्य जीवनात समृद्ध आहे त्यांचे जीवन म्हणजे एक समग्र जीव . त्यांचे जीवन म्हणेज झोरबा आणि बुद्धाचा समन्वय आणि म्हणून भंवरलाल म्हणजेच जोरबा दी बुद्धा ते आपल्या जीवनाचे ६९ यशस्वी वर्ष पूर्ण करून ७० व्या वर्षात प्रवेश करीत आहे. साभार-मधुविचार

☆☆☆☆☆☆

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा

डॉ. सुहास जेवळीकर

किशोर थोरात

ओमप्रकाश वर्मा

शेख मुख्तार

भी.द. आराक

नंदकुमार गांधीले

कैलास पाटील

सिद्दीक मोतीवाला

हारुण मलिक

बैजू पाटील

शमसेरसिंग सोधी


जमील अहेमद

सत्तार खान

निसार अहेमद